# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २४/०६/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### घरफोडी

**१) पो.स्टे. उमरेड** :– अंर्तगत ०३ कि. मी. अंतरावरील मौजा लिना लॉउट उमरेड गिरड रोड येथे दिनांक २२/०६/२२ चे २१.०० वा. ते दि. २३/०६/२२ चे ०३.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– अंकित भारत मुन, वय २६ वर्ष, रा. अडयाळवाले लेआउट यांचे बाहेरून आलेले पार्सल स्टोअर करणे अणि वितरण करणे चे दुकाण आहे. फिर्यादी यांनी दुकाणाकडे जाउन पाहीले असता दुकाणाचे समोरील लोखंडी शटर खोलुन अंदाजे ०२ फुट उघडा होता पाहणी करणे कामी आत जावुन पाहीले असता दुकान मधील अंदाजे १०९ पार्सल चोरीला गेल्याचे दिसले. सदर पार्सलची अंदाजे किंमती ७०,०००/–रू. असुन आतमध्ये ठेवलेल्या सीसीटीव्ही कॅमेरचे हार्डडिस्क किंमती १,०००/–रूपयाचे चोरून घेवुन गेले. अज्ञात आरोपीने फिर्यादीचे दुकानाचे समोरील लोखंडी शटरचा कुलुप तोडुन दुकानात प्रवेश करून कि. ७१,००० /–रू. चा मुद्देमाल चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री राजेश पाटील पो स्टे उमरेड मो.नं. ९०४९९८९३४१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** :– अंर्तगत ०४ कि. मी. अंतरावरील डहाळी येथे दिनांक २२/०६/२२ चे १३.३० वा. ते दि. २३/०६/२२ चे ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रूपेंद्र सुरेश आखरे, वय ३१ वर्ष, रा. डहाळी हे काही कामानिमीत्य नातेवाईकांकडे गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या घराचा दाराचे कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरातील आलमारी चे कुलुप तोडुन लॉकरमध्ये ठेवले असलेले सोन्या–चांदीचे दागिने किमती ५०,०००/–रु. व नगदी १०,०००/–रु. असा एकुण कि. ६०,०००/–रु. चा मुद्देमाल चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मेश्राम हे करीत आहे.

## चोरी चा प्रयत्न

**पो.स्टे. कुही** :— फिर्यादी नामे— योगेश भोंदुजी रामटेके, वय ३७ वर्ष, रा. मुरमाळी लाखणी ह.मु.भारत माता चौक कुही ता. कुही यांनी दि. २२/०६/२०२२ रोजी रात्री ०८.३० वा. दरम्यान बँकेचे कामकाज करून बँक बंद करून घरी गेले व एटीएम बंद करण्यासाठी रोशन राउत हा ०९.३० वा सुमारास एटीएम चे कुलुप बंद करून आपल्या घरी गेला. दि. २३/०६/२२ रोजी सकाळी ०७.०० वा. बँकेचे चपराशी राजेंद्र महुर्ले हा बँकची सापसपाई करण्याकरीता आला असता त्याला एटीएम च्या दाराचे लॉंक तुटलेले दिसले. त्यामुळे त्याने फिर्यादीला फोन करून सांगितले फिर्यादी हे तेथे आले असता लॉंक तुटलेला दिसले. त्यांनी बँकेचे सीसीटीव्ही फुटेज चेक केले असता अंदाजे ०१.१५ वा. एक अज्ञात आरोपीने हातात राहाळ सारखे वस्तु घेवुन एटीएम चे लॉंक तोडतांनी दिसला आत मध्ये जाउन एटीएम चे कवर काढण्याचा प्रयत्न केला परंतु कुठल्याही प्रकारची चोरी झाली नाही. तसेच बँकेचे समोरील प्रेमानंदजी दंडारे यांच्या घरी चोरी करण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ४२७, ३८०, ५११ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री देविदास ठमके मो.नं. ८७८८५५३१३९ हे करीत आहे.

## अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीतांना अटक

**१) पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील मौजा चनकापुर येथे दिनांक २४/०६/२०२२ चे ०६.२० वा. दरम्यान आरोपी क्रं. ०१. आशिष उर्फ गुल्लु राजबहादुर वर्मा वय २३ वर्ष, रा. वार्ड ०३ चनकापुर व ०२. सुरज उर्फ बारीक रमेश वरणकर वय २३ वर्ष रा. वार्ड ०६ चनकापुर हे कोणतातरी हस्तक्षेपनिय गुन्हा करण्याचा उद्देशाने कॅनल रोडवर फिरत असतांना त्यांच्या ताब्यातुन विना परवाना देशी बनावटी माउझर व ०२ पितळी जिवंत काडतुस असा एकुण ११,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे सपोनि श्री दिपक कांक्रेटवार पो स्टे खापरखेडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३, २५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री दिपक कांक्रेटवार मो. क्र ८३२९६६६६७८ हे करीत आहेत.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा एमआयडीसी बोरी रेल्वे गेट कळमेश्वर येथे दिनांक २२/०६/२०२२ चे २२:०० वा. ते २२:३० वा. दरम्यान आरोपी नामे— राजु उर्फ राजेंद्र अशोक पुसदकर वय २० वर्षे रा. हुडको कॉलोनी कळमेश्वर, ता. कळमेश्वर जि. नागपुर हा आपले जवळ एक लोखंडी पाते असलेली तलवार किमती अंदाजे ५०० रु. ची एम.आय.डी.सी. रेल्वे गेट कळमेश्वर येथे बडबड करित हातामध्ये तलवार घेउन भिरकावीत फिरत असतांना मिळुन आला.

सदर प्रकरणी सरतर्फे स.फौ. मन्नान नौरंगाबादे पो.स्टे. कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदाअन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आह. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार मन्नान नौरंगाबादे हे करीत आहेत.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. केळवद – दिनांक २२/०६/२०२२ चे ०२.०० वा. ते ०२.३० वा. चे सुमारास पो.स्टे. केळवद हद्दीत फिर्यादीयांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी हिचे अज्ञातपणेचा फायदा घेवुन आरोपी क्र. १. प्रितम पाचारे व त्याचा मित्र दोन्ही रा. टेंभुरखेडा ता. वरूड जि. अमरावती यांनी संगणमत करून त्याचे लाल रंगाचे मोटरसायकल वर बसवुन फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार कामठे हे करीत आहे.

## नैसर्गिक विज पडुन मृत्यू

१) पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत १३ कि.मी. अंतरावरील रेंगातूर शेत शिवार ता.कुही जि.नागपूर येथे दिनांक २३/०६/२०२२ चे १५.३० वा. ते १६.०० वाजता दरम्यान **राजु उर्फे रामा ठाकरे (मृतक), वय ११ वर्ष रा. रेंगातूर ता.कुही** हा घराजवळील मुलासोबत कॅनलचे पारीजवळ खेळत होता. तेव्हा आकाशातील विज कडाळुन नैसर्गिक विजेचा मृतकला स्पर्श झाल्याने तो खाली पडला व त्याचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे नाव– युवराज स्त्रीपत ठाकरे वय ४५ वर्ष रा.रेंगातूर ता.कुही जि.नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस हवालदार संजय पायक हे करीत आहे.

२) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत १३ कि.मी. अंतरावरील मौजा बखारी येथे दिनांक २०/०६/२०२२ चे १५.०० वा. दरम्यान **सौ मायाबाई कैलाश केवट (मृतक), वय ५० वर्ष रा बखारी** ही शेतात काम करीत असतांना तिच्या अंगावर विज पडल्याने ती बेशुध्द झाली. तिला उपचाराकामी वानखेडे हॉस्पीटल कन्हान येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी उपचारकामी घेतले नाही. त्यानंतर तिला उपचाराकामी उपजिल्हा रूग्णालय कामठी येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन तिला मृत घोषीत केले. पो.स्टे. जुनी कामठी यांचे कडुन प्राप्त कागदपत्रावरून सदरचा मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे मपोहवा शहनाज अंसारी पो.स्टे. जुनी कामठी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस हवालदार हरिष मो.क्र. ९५२७६६६९२२ हे करीत आहे.

३) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत मौजा चनकापुर रिजनल स्टोअर्स येथे दिनांक २३/०६/२०२२ चे १२.३० वा. दरम्यान **प्रशांत दिपक नाईक (मृतक), वय २५ वर्ष, रा. डब्ल्यु सी एल सावनेर** हा डब्ल्यु सी एल स्टोअर्स येथे वडीला सोबत गेले असता अचानक पाउस आल्याने वडाचे झाडाखाली थंबले असता अचानक विज पडुन तो गंभीर जखमी झाला. त्याला उपचाराकामी डब्ल्यु सी एल हॉस्पीटल वलनी येथे नेले असता तेथील वैदयकीय अधिकारी यांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शशांक दिपक नाईक, वय ३१ वर्ष, रा. डब्ल्यु सी एल सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलिस हवालदार सुर्यभान जळते मो.क्र. ९६७३८३७००७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**